(२)

विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालये
शासकीय कर्मचा-यांप्रमाणे सुविधा

1. रजा
2. वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती
3. अतिरिक्त कामाबद्दल वेतन
4. आगावू वेतनवाढी
5. कालबध्द पदोन्नती
6. अनुकंपा तत्वावर नोकरी

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय एनजीसी 1299/4871/विशि-4
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - 400 032.
दिनांकः- 28 जानेवारी, 2000

वाचा:- 1.शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एनजीसी 1279/163392/ (107)/32-सेल, दिनांक 15 डिसेंबर, 1979.

2. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. युएसजी 1182/(720)/ युनि-4, दिनांक 30 नोव्हेंबर, 1982.

3. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्र. एनजीसी 1279/ 181280/(206)/विशि-4, दिनांक 4 जून, 1985.

4.शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. एनजीसी 1595/9432/(3054)/विशि-4, दिनांक 29 सप्टेंबर, 1995.

5. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. युएसजी 1895/(3181)/विशि-4, दिनांक 15 मे, 1996.

6. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. एनजीसी 1794/5044/ (2870)/विशि-4, दिनांक 14 नोव्हेंबर, 1996.

7. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. एनजीसी/1295/ 57817/ प्रकरण क्र. 3109/विशि-4, दिनांक 28 नोव्हेंबर,.1996.

8. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. एनजीसी 1892/(2259)/विशि-4, दिनांक 5 डिसेंबर, 1996.

9. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग, क्र. एनजीसी 1295/ 57817/ प्रकरण क्र. 3109/ विशि-4, दिनांक 27 जानेवारी, 1997.

10. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. युएसजी 1294/2912-अ/विशि-4, दिनांक 29 मार्च, 1997.

11. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनजीसी 1794/ 18091/ (2976)/विशि-4, दिनांक 8 ऑक्टोबर, 1997

12. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनजीसी 1794/ 18091/ (2976)/विशि-4, दिनांक 23 मार्च, 1998.

13. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. एनजीसी 1597/ 2143/ (4409)/विशि-4, दिनांक 26 मे, 1998.

..2/-

प्रस्तावना:-प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाबरोबर उच्च शिक्षणाच्या सोई विस्तृत प्रमाणावर उपलब्ध करुन शिक्षणाला उत्तेजना देण्याचे त्यासाठी खाजगी संस्थांना अधिकाधिक वाव देण्याचे धोरण शासनाने ठरविले आहे. हे धोरण राबविण्यासाठी विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना 100% वेतन योजना शासनाने लागू केली आहे. त्याच बरोबर शासकीय कर्मचा-यांना ज्या सोयी सुविधा देण्यांत येतात त्याच योग्य त्या फेरफारांसह विद्यापीठे व त्यांना संलग्नित अशासकीय महाविद्यालये यांतील वेतन अनुदान योजनेखाली येणा-या पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनाही शासनाने लागू केल्या आहेत. वरील प्रमाणे नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना देण्यांत येणा-या सवलतीचे संकलन करण्याचा प्रश्न विचाराधीन होता. त्याप्रमाणे संकलित आदेश एकत्रितरित्या खालीलप्रमाणे पुन्हा प्रसृत करण्यात येत आहेत.

## शासन निर्णय

1. <u>रजेच्या सवलती:-</u>

अ) शासन आता असे आदेश देत आहे की, शासकीय कर्मचा-यांना अनुज्ञेय असलेली रोखीने अर्जित रजा सवलती योग्य त्या फेरफारासह कृषितर विद्यापीठे व त्यांना संलग्नित अशासकीय महाविद्यालये यातील वेतन अनुदान योजनेखाली येणा-या पूर्णवेळ शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू करण्यात याव्यात.

ब) राज्य शासकीय कर्मचा-यांना (1) स्वग्रामी जाण्यासाठी रजा प्रवास सवलत व (2) चार वर्षातून एकदा राज्यात कोठेही जाण्यास रजा प्रवास सवलत योजना लागू केली आहे. राज्य शासनाच्या धर्तीवर विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित कला, वि... वाणिज्य, शिक्षणशास्त्र, विधी, अनुदानित अशासकीय अभियांत्रिकी/तंत्र शास्त्र महाविद्यालये व तंत्र निकेतने/तंत्र पदविका संस्था इत... महाविद्यालयातील वेतन अनुदान योजनेखाली येणा-या पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना लागू करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

शासकीय कर्मचा-यांना या योजनेच्या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी ज्या अटी व शर्ती आहेत त्याच अटी व शर्ती विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील कर्मचा-यांना या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी लागू राहतील. तसेच शासन असेही आदेश देत आहे की, उपरोक्त नियमामध्ये जशा सुधारणा होतील त्यांचे लाभ या कर्मचा-यांना उपलब्ध करण्यात यावेत.

क) राज्य शासकीय कर्मचा-यांना वेळोवेळी शासनाकडून निर्गमित होणा-या आदेशानुसार मिळणा-या सोयी सवलती विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील कर्मचा-यांना जशाच्या तशा देण्याचा शासनाचा निर्णय आहे. राज्य शासकीय महिला कर्मचा-यांच्या बाबतीत प्रसुती रजेच्या विद्यमान तरतूदीमध्ये सुधारणा करण्यांत आल्या आहेत. ते विचारांत घेऊन शासन या आदेशान्वये विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील महिला कर्मचा-यांच्या प्रसुती रजा मंजूर करण्याबाबत परिशिष्ट ''एक'' मध्ये दिल्याप्रमाणे आदेश देत आहे.

ड) <u>प्राचार्य पदास अर्जित रजा:-</u> मान्यता व अनुदानित अशासकीय महाविद्यालयांतील प्राचार्यांचा समावेश ''शिक्षक''संवर्गात ... परंतु दीर्घ सुटीच्या काळात प्राचार्यांना प्रशासकीय कारणास्तव दीर्घ सुटीचा लाभ घेण्यास प्रतिबंध करण्यात आला तर त्यांना अर्जित रजा देय होते. शासन आता असे आदेश देत आहे की मान्यता व अनुदान प्राप्त अशासकीय महाविद्यालयांतील प्राचार्यांना प्रशासकीय कारणास्तव दीर्घ सुटीचा लाभ घेण्यापासून प्रतिबंध करण्यात आला असेल तर त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, 1981 च्या नि... 52, नियम 54, नियम 68 मधील विहित केलेल्या तरतुदीनुसार अर्जित रजेचे लाभ मंजूर करण्यात यावेत. मात्र अर्जित रजा साठविण्याची कमाल मर्यादा 240 दिवस एवढी राहील.

दीर्घ सुट्टयांच्या कालावधीत, प्राचार्य महाविद्यालयांत उपस्थित असल्याचे प्रमाणपत्र संबंधित विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण) यांचेकडे प्राचार्यांच्या सेवा पुस्तिकेसह सादर करणे संस्था प्रमुखावर बंधनकारक राहिल. विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, यांनी सेवा पुस्तिकेत योग्य त्या नोंदी घेऊन सेवा पुस्तिका महाविद्यालयात परत पाठविल्या जातील याची खात्री करुन घेणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. हे आदेश 29 मार्च, 1997 या दिनांकापासून लागू राहतील. या आदेशाचा फायदा पूर्वीच्या कालावधीसाठी ग्राहय धरला जाणार नाही.

2. **वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती:-**

शासन असे आदेश देत आहे की, महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय सवलती) नियम 1961 व त्यात वेळोवेळी झालेल्या सुधारणान्वये **(परिशिष्ट-2-इंग्रजी रुपांतरात दर्शविल्याप्रमाणे)** शासकीय व शासन प्राधिकृत रुग्णालये यामध्ये वैद्यकीय उपचार करुन घेणे व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती या शासकीय कर्मचा-यांना मिळणा-या सवलती योग्य त्या फेरफारांसह कृषितर विद्यापीठे व त्यांना संलग्नित अशासकीय महाविद्यालये यांतील वेतन अनुदान योजनेखाली येणा-या पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू करण्यात याव्यात. शासन असेही आदेश देत आहे की, उपरोक्त नियमांमध्ये जशा सुधारणा होतील, त्यांचे लाभ या कर्मचा-यांना उपलब्ध करण्यात यावेत.

3. **दोन किंवा अधिक पदांवर नियुक्त्यांच्या कालावधीतील अतिरिक्त वेतन/विशेष वेतन:-**

विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील कर्मचा-यांच्या वेतनात 1 जानेवारी, 1986 पासून सुधारणा करण्यांत आली असल्याने व शासकीय कर्मचा-यांच्या अतिरिक्त कार्यभाराबद्दल विशेष वेतन देण्यात येते हे विचारात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचा-यांनी स्वतःच्या पदाव्यतिरिक्त दुस-या पदाचा कार्यभार धारण केला असेल तर अशा दुस-या पदाकरीता यापुढे त्या पदाच्या संभाव्य वेतनाच्या 10 टक्के दराने परंतु दरमहा रुपये 500/- एवढया मर्यादेपर्यंत अतिरिक्त वेतन/विशेष वेतन घेण्यास परवानगी देण्यांत येत आहे.

4. **अतिउत्कृष्ट कामाबद्दल आगावू वेतनवाढी:-**

शासन असे आदेश देत आहे. अतिउत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढीच्या संदर्भात शासकीय सेवकांना लागू केलेले आदेश योग्य त्या फेरफारासह विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांना जसेच्या तसे लागू करण्यात यावेत. कर्मचा-यांना आगावू वेतनवाढी देण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठांनी स्वतःच्या व त्यांच्याशी सलंग्नित असणा-या महाविद्यालयांतील कर्मचा-यांच्या संदर्भात ही एकत्रित कार्यवाही करुन विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सादर करावेत. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी शासकीय कर्मचा-याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही 1069/डी, दिनांक 26 जून, 1970 व क्र. एसआरव्ही 1083/सीएन/16-आठ, दिनांक 6 सप्टेंबर, 1983 व शासन निर्णय क्र. एसआरव्ही 1070/सीएन-127-79-आठ, दिनांक 4 डिसेंबर, 1979 चे आदेश लक्षात घेऊन प्रस्तावाची छाननी करुन कर्मचा-यांना आगावू वेतनवाढी देण्याबाबतच्या विद्यापीठे व महाविद्यालयांतील प्रस्तावाना मान्यता देण्याबाबतची कार्यवाही करावी.

5. **कालबध्द पदोन्नती:-**

शासन असे आदेश देत आहे की शासकीय सेवेतील गट क व गट ब (वर्ग 3 व 4) संवर्गातील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे असलेली कुंठितता घालविण्यासंबंधीची कालबध पदोन्नती योजना लागू केली आहे ती योजना विद्यापिठे व संलग्नित महाविद्यालयातील तंसेच अशासकीय अनुदानित पदवी व पदविका स्तरावरील तंत्र शिक्षण संस्थातील वर्ग 3 व वर्ग 4 च्या सेवकांना लागू करण्यात यावी.

या पदोन्नती योजनेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

गट क व ड (पूर्वीचे वर्ग 3 व 4) मधील पदधारकांना 12 वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्यात येईल. ज्या कर्मचा-यांना पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही अशा कर्मचा-यांना या निर्णयासोबतच्या **परिशिष्ट-3** मध्ये दर्शविण्यात आल्यानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात येईल. या योजनेची प्रमुख वैशिष्टये व अंमलबजावणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे:-

अ) ही योजना 1 ऑक्टोंबर, 1994 पासून अमलांत येईल.

ब) या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहित कार्यपध्दती जेष्ठता, पात्रता, अर्हता, परीक्षा, विभागीय परीक्षा (जेथे आहे तेथे) या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

क) सरळ सेवेने प्रविष्ट झालेल्या अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत एकवेळ या योजनेअंतर्गत 12 वर्षानंतरच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय असेल.

ड)     त्या कर्मचा-यांना यापूर्वी दोनपेक्षा जास्त पदोन्नती मिळालेल्या आहेत अशा कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळणार नाही.

ई)     गट ड मधील (वर्ग-4 मधील) कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत गट क मधील (वर्ग-3 मधील) वेतनश्रेणी म्हणजे रुपये 950-1400 दिली तरी त्यांचे सेवानिवृत्तीचे वय 60 वर्षे देय राहील. मात्र गट क मधील अन्य वरिष्ठ पदावर त्यांना पदोन्नती मिळाल्यास त्यांचे सेवानिवृत्तीचे वय 58 वर्षे राहील. गट क मधील पदधारकांना ब मधील राजपत्रित पदावर (वर्ग-2) पदोन्नती देण्यासाठी या योजनेअंतर्गत विचार केला जाणार नाही.

म)     या पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चितीत लाभ देण्यात येईल. मात्र वेतननिश्चितीत मिळालेला हा लाभ त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

न)     जर कर्मचा-यास विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखाली पदोन्नतीनंतर कर्मचा-यांस मूळ वेतनश्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

व)     या योजनेअंतर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचा-याचे नाव कनिष्ठ (मूळ) संवर्गाच्या जेष्ठता सूचीत राहील आणि सेवा प्रवेश नियमातील तरतूदीनुसार उपलब्ध रिक्ततेत योग्य वेळी नियमित पदोन्नतीसाठी त्यांचा विचार करण्यात येईल. नियमित पदोन्नतीस अपात्र ठरविलेल्या कर्मचा-यांस या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्याचप्रमाणे नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचा-यास देखील या पदोन्नती लाभ मिळू शकणार नाही. या आधीच त्यांना पदोन्नती दिली असल्यास मूळच्या पदावर पदावनत करण्यात येईल. तशा आशयाचे बंधपत्र कर्मचा-यांना लिहून द्यावे लागेल. मात्र देण्यात आलेल्या आर्थिक लाभांची वसूली केली जाणार नाही.

शासकीय सेवकाबाबत करण्यात आलेला खुलासा योग्य फेरफारासह **परिशिष्ट 4** म्हणून जोडण्यात आला आहे.

6.     **अनुकंपा तत्वावर नियुक्ती:-**

विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवेत असतांना झालेल्या मृत्यूमुळे किंवा मानसिक अथवा शारीरिक विकृतीमुळे वैद्यकीय कारणास्तव मुदतपूर्व सेवानिवृत झालेल्या कर्मचा-यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यास शासन मान्यता देत आहे.

(2)     शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. अकंपा 1095/प्र.क्र. 34-अ/आठ, दिनांक 23.8.1996, 11.9.1996 आणि 24.9.1996 व क्रमांक अकंपा 1096/प्र.क्र.67/96/आठ दिनांक 20.12.1996 अन्वये, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा मूळ योजनेत काही बदल करण्यात आले आहेत. हे बदल विचारात घेता, शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण आणि सेवायोजन विभाग क्र. एनजीसी 1595/9423/(3054)/विशि-4, दिनांक 29.9.95 मधील विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयातील अनुकंपा तत्वावरील नेमणूक योजनेत काही बदल करण्यात येत असून त्यानुसार सुधारित **परिशिष्ट-5** सोबत जोडले आहे.

(3)     ज्या विद्यापीठीय व महाविद्यालयीन कर्मचा-यांना वैयक्तिक कायद्यानुसार एकापेक्षा जास्त विवाह करण्यास प्रतिबंध नसेल अ[illegible] कर्मचा-यांच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असल्यास ज्या पत्नीला किंवा तिच्या मुलाला/अविवाहित मुलीला अनुकंपा तत्वावर नियुक[illegible] द्यायची आहे त्या व्यतिरिक्त अन्य पत्नीचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

(4)     गट क मधील पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणा-या कर्मचा-याला पदाच्या उपलब्धतेअभावी गट ड मधील पदावर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी, अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने भरण्यात येणा-या पदावरील समजण्यात यावी. मात्र गट ड मधील पदावर अनुकंपा योजनअन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसे करण्यात आले असेल तरच गट क मधील पदावर नियुक्ती देता येईल.

(5)     अनुकंपा तत्वावर लिपिक-टंकलेखक पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांना टंकलेखनाचे विहित वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यास 2 वर्षांची मुदत पुढील अटींच्या अधीनस्त देण्यात यावी.

अ)विहित कालावधीत हे प्रमाणपत्र सादर न केल्यास नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल अशी अट नियुक्ती आदेशात नमूद करण्यात यावी.

ब)दिनांक 16 ऑक्टोबर, 1993 च्या आदेशानुसार ज्या लिपिक-टंकलेखकांच्या नियुक्त्या 11 महिन्यात विहित टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्याने संपुष्टात आणल्या गेल्या आहेत त्यांनी आवश्यक प्रमाणपत्र प्राप्त केले असल्यास त्यांना पुन्हा नियुक्ती देण्यात यावी.

क)दिनांक 16.10.1993 नंतर ज्या लिपिक-टंकलेखकांनी टंकलेखनाचे प्रमाणपत्र 11 महिन्यात प्राप्त केलेले नाही तथापि, त्यांच्या नियुक्त्या पुढे चालू ठेवण्यात आल्या आहेत, त्यांच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात.

ड)कोणत्याही कारणास्तव दोन वर्षांपेक्षा अधिक मुदतवाढ अनुज्ञेय असणार नाही हा कालावधी संपताच नियुक्ती संपुष्टात आणावी.

इ)मृत कर्मचा-यांच्या विधवेच्या बाबतीत दोन वर्षात टंकलेखनाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे कौटुंबिक जबाबदारीमुळे शक्य होत नसल्याने मुदत वाढ देण्याची विनंती संबंधित विधवेकडून करण्यात येते. याचा सर्वकष विचार करुन शासनाने असा निर्णय घेतला आहे की, मृत कर्मचा-यांच्या विधवेच्या बाबतीत टंकलेखनाचे विहित वेग-मर्यादेचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यास मूळ नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षानंतर एक वर्षाची मुदतवाढ खालील अटींच्या अधीन राहून देण्यात यावी.

(1) संबंधित कर्मचा-याने दोन वर्षात टंकलेखनाच्या परीक्षेसाठी उपलब्ध चार संधीपैकी किमान तीन संधीचा लाभ घेतलेला असणे आवश्यक आहे.

(2) उपरोक्त सवलत मृत शासकीय कर्मचा-याच्या केवळ विधवा कर्मचा-यास लागू राहील. कुठल्याही परिस्थितीत त्या पुढील कालावधीत मुदतवाढ मिळणार नाही.

(3) तसेच ही सवलत वैद्यकीय कारणास्तव अकाली सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांच्या पत्नीस देखील लागू राहील.

(4) या वाढीव कालावधीत देखील टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण न होऊ शकणा-या कर्मचा-यांच्या सेवा समाप्त करण्यात याव्यात. तसा उल्लेख मुदतवाढीच्या आदेशातच करण्यात यावा.

(5) वरील अटीत बसणा-या प्रस्तावांच्या बाबतीत अशी मुदतवाढ देण्याचे प्राधिकार संबंधित नियुक्ती प्राधिका-यांना देण्यात येत आहेत.

फ) लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्ती टंकलेखनाच्या वेगमर्यादेच्या प्रमाणपत्रा अभावी संपुष्टात आणण्यात आलेल्या उमेदवाराच्या कुटुंबास आर्थिक हलाखीत रहावे लागू नये या उद्देशाने त्याचा गट ड मधील नियुक्तीसाठी पदाची उपलब्धता विचारात घेऊन नव्याने नियुक्ती देण्याबाबत विचार करण्यात यावा. मात्र अशा रितीने गट ड मधील पदावर नियुक्ती स्वीकारल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत गट क मधील पदासाठी त्याचा विचार करता येणार नाही, ही बाब त्यांना नियुक्तीपूर्वी स्पष्ट करावी.

6. मृत, वैद्यकीय कारणास्तव अकाली सेवानिवृत्त होणा-या विद्यापीठ/महाविद्यालयीन कर्मचा-यांच्या नातेवाईकांना अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती देण्याची जबाबदारी संबंधित आस्थापना अधिका-यांची (विद्यापीठांसाठी कुलसचिव व महाविद्यालयांसाठी प्राचार्य) राहील. आस्थापना अधिका-याने अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती विद्यापीठीय/ महाविद्यालयीन कर्मचा-यांच्या कुटुंबियांना त्वरित उपलब्ध करुन द्यावी. (सोबत नमुना माहितीसाठी जोडला आहे.)

7. यापूर्वी जी प्रकरणे पूर्वीच्या नियमानुसार निकाली काढण्यात आली आहेत, अशा प्रकरणांची या आदेशानुसार पुनतपासणी करण्याची आवश्यकता नाही. तथापि प्रलंबित प्रकरणे निकालात काढतांना उपरोक्त तरतूदी विचारात घेऊन कार्यवाही करण्यात यावी.

महाराष्ट्र अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सेवाविषयक (शर्ती व अटी) नियम 1984 मधील यासंबंधातील विद्यमान तरतूदी या शासन निर्णयातील तरतूदीपुरत्या सुधारण्यात याव्यात असे मानण्यात यावे. उपरोक्त नियमामध्ये रितसर सुधारणा यथावकाश करण्यात याव्यात.

या प्रित्यर्थ येणारा खर्च खालील लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

अ) 2202-सर्वसाधारण शिक्षण-03-विद्यापीठीय व उच्च शिक्षण-102-विद्यापीठाना सहाय्य (एक) व (ए) सर्व- साधारण शिक्षणासाठी-विद्यापीठाना अनुदान.

ब) 2202-सर्वसाधारण शिक्षण-03 विद्यापीठीय व उच्च शिक्षण-104-अशासकीय महाविद्यालयांना व संस्थाना सहाय्य (एक)(ए) अशासकीय महाविद्यालयांना सहाय्य (एक) बिनसरकारी वाड.मय विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयांना अनुदाने.

हे आदेश संदर्भाधिन आदेशात सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागाने दिलेल्या पूर्वसंमती विचारांत घेऊन निर्गमित क येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ.मा.भट्टलवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,
राज्यपाल व कुलपती यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विद्यापीठाचे कुलगुरू
सर्व विद्यापीठाचे कुलसचिव
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, व्यवसाय शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई, नागपूर, औरंगाबाद, पुणे, अमरावती, कोल्हापूर, जळगांव, नांदेड
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-1/2, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी
महाराष्ट्रातील सर्व अशासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य (शिक्षण संचालकांमार्फत)
सामान्य प्रशासन विभाग
वित्त विभाग
उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती/विशि-4

C:mydocuments:Uni-4:Gr.Dhanmhr

## परिशिष्ट - 5

## विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयात अनुकंपा कारणास्तव सेवेत नोकरी देण्याबाबतची सुधारित नियमावली.

1. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयात अनुकंपा कारणास्तव करावयाच्या नेमणूकांना हे नियम लागू राहतील.

2. खालील प्रकारामध्ये मोडणा-या विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे (स्थायी व अस्थायी आस्थापनेवरील कर्मचारी धरुन) 3 (अ) येथील नातेवाईक या नियमानुसार अनुकंपा कारणास्तव वरील सेवेत नेमणुकीसाठी पात्र ठरतील.

अ) उपरोक्त नमूद सेवेत असतांना दिवंगत झालेले कर्मचारी

ब) क्षय / कर्करोग इत्यादि गंभीर आजारांमुळे सक्षम वैद्यकीय अधिका-यांच्या प्रमाणपत्रानुसार अकाली निवृत्त झालेले शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी, गट ''क'' व त्यावरील गटातील अधिकारी व ''ड'' मधील कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्या वयास अनुक्रमे किमान 55 वर्षे/57 वर्षे पुर्ण होण्यापूर्वी वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्ती घ्यावी लागलेल्या कर्मचा-यांच्या नातेवाईकासच या योजनेअंतर्गत लाभासाठी पात्र समजण्यात यावे.

क) मानसिक किंवा शारीरिक विकलांगता आल्याने सक्षम वैद्यकीय अधिका-याने पुढील सेवेसाठी अक्षम ठरविल्याने अकाली निवृत्त करण्यात आलेले किंवा वरील कारणास्तव काढून टाकण्यात आलेले कर्मचारी.

ड) वरील सेवेत कर्तव्य बजावताना अपघाताने अपंग झालेले परंतु महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, 1982 मधील नियम 72 (3) अनुसार पर्यायी पद देऊ करुनही ते न स्वीकारता सेवानिवृत्ती स्वीकारणारे कर्मचारी.

3. अ) विद्यापिठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयातील दिवंगत/अकाली निवृत्त कर्मचा-यांची पती/पत्नी, मुलगा किंवा अविवाहित मुलगी अथवा मृत्यूपूर्वी/अकाली सेवानिवृत्तीपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला/ घेतलेली मुलगा/ अविवाहित मुलगी ही नियमानुसार नेमणूकीस पात्र नातेवाईक मानण्यात येतील.

मृत विद्यापीठीय/महाविद्यालयीन कर्मचा-यांचा, वैद्यकीय कारणास्तव सेवानिवृत्त होणा-या विद्यापीठीय/महाविद्यालयीन कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल व त्याच्या कुटुंबातील पात्र नातेवाईकांव्यतिरिक्त अन्य कोणीही अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून.

केवळ अविवाहित विद्यापीठीय/महाविद्यालयीन कर्मचा-यांच्या बाबतीत त्यांच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा अविवाहित बहिण.

उपरोक्त योजनेअंतर्गत नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून कुटुंबातील अन्य व्यक्तीचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

ब) सदर नेमणूक वरील कर्मचा-यांच्या फक्त एकाच नातेवाईकास देता येईल.

4. अ) अनुकंपा तत्वावर संबंधित नातलगाची शैक्षणिक पात्रता व वय यानुसार विद्यापीठे व संलग्नित अनुदानित अशासकीय महाविद्यालयातील सेवेत सरळसेवा प्रवेशाने भरल्या जाणा-या पदावर नियुक्ती करता येईल.

ब) संबंधित पदांसाठी विहित शैक्षणिक पात्रता आणि निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी या नेमणूकीसाठी कटाक्षाने पाळण्यात येतील. परंतु उच्च वयोमर्यादेची अट राहणार नाही.

क) तथापि दिवंगत/अकाली निवृत्त कर्मचा-यांची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास तिच्या बाबतीत वर्ग-4 मध्ये नेमणूकींसाठी शैक्षणिक पात्रतेची अट शिथील करता येईल.

5. अ) अनुकंपा कारणास्तव नेमणुकीसाठीचा अर्ज शासकीय कर्मचारी दिवंगत/अकाली निवृत्त झालेल्या दिवसापासून पाच वर्षांचे मुदतीत करणे आवश्यक असेल.

परंतु सेवेत असतांना दिवंगत झालेल्या किंवा दुर्धर व्याधीमुळे अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांच्या कुटुंबातील अज्ञान वारसदारांच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे 18 वर्षाचा झाल्यावर एक वर्षाच्या आत या योजनेखाली नोकरीसाठी अर्ज करावा.

ब) दिवंगत/अकाली निवृत्त कर्मचारी ज्या विद्यापीठात/महाविद्यालयात काम करीत होता, त्या विद्यापीठ/महाविद्यालयातील संबंधित नियुक्ती प्राधिकारी या नियमानुसार नेमणूक देण्यास सक्षम राहील. त्यासाठी त्याने निवड समितीचा सल्ला घेणे आवश्यक नाही. मात्र, नातेवाईकाने सदर प्राधिका-याकडे वरील मुदतीत नेमणूकीसाठी अर्ज करणे आवश्यक राहील.

6. अ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरीता मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा यापुढे राहणार नाही.

ब) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना असे प्रस्ताव या योजनेच्या मागील भूमिका लक्षात घेऊन जो कर्मचारी मृत झाला त्याच्या कुटुंबियांना तात्काळ उद्भवणा-या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्याच्या उद्देशाने विचारात घ्यावेत. एखाद्या कुटुंबात मृत कर्मचा-याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल, तथापि ती त्याच्या कुटुंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थि परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे हे ठरवितांना नियुक्ती अधिका-याने अत्याधिक दक्षता घ्यावी जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत नाही या नावाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही.

या संदर्भात नियुक्ती अधिका-याने निवृत्तीवेतनाची रक्कम, कुटुंबातील व्यक्तींची संख्या, त्याची मालमत्ता, दायित्व, गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती इ. बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे.

7. उपरोक्त 4(क) व्यतिरिक्त कोणत्याही अटी शिथिल करण्याची शक्ती शासनाकडे राहणार नाही.

## अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची वैशिष्ट्ये

| | | |
|---|---|---|
| 1. | उद्देश | मृत/वैद्यकीय कारणास्तव अकाली सेवानिवृत्त विद्यापीठीय/महाविद्यालयीन कर्मचा-यांच्या कुटुंबियांना त्वरित आर्थिक आधार मिळणे. |
| 2. | पात्र नातेवाईक | अ) पती/पत्नी, मुलगा, अविवाहित मुलगी<br>ब) अविवाहित कर्मचा-यांच्या बाबतीत सर्वस्वी अवलंबून असणारा अविवाहित भाऊ अथवा बहीण.<br>क) मृत कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल तर त्याची सून |
| 3. | अर्ज करण्याची मुदत | मृताच्या/अकाली सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून 5 वर्षे मुदत |
| 4. | शैक्षणिक अर्हता | 1. त्या त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार तथापि विधवेच्या बाबतीत गट "ड" मधील नियुक्ती करिता शिथिलक्षम.<br>2. लिपिक-टंकलेखक पदावरील नियुक्ती करिता टंकलेखनाचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यास 2 वर्षाची सवलत |
| 5. | अर्ज | शक्यतो विहित प्रपत्रात करणे. |

उपरोक्त माहिती मिळाल्याबाबत कुटुंबियांकडून पोच घेणे आवश्यक आहे.

****************